# फिर्याद

कासोदा पो.स्टे., जळगाव.
दि.२८/०१/२०२६

मी स्मिता दत्तात्रेय नवघरे, वय ३७ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव. मो.नं.७३८७३५४६७२.

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगांव येथे मागील ०१ वर्षापासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक २७/०१/२०२६ रोजी तक्रारदार असलम शेख गफ्फार,वय ३०, धंदा-मजुरी रा. मुल्लावाडा एरंडोल ता.एरंडोल जि.जळगाव यांनी पोलीस उप अधिक्षक श्री. योगेश ठाकुर यांना फोनद्वारे संपर्क साधुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेसंबंधी तक्रार असल्याचे सांगुन ते जळगाव ते एरंडोल रोडवरील एरंडोल शहराचे अलीकडे विखरण पटाचे चारीजवळ भेटणार असल्याचे सांगीतले होते. पोलीस उप अधिक्षक श्री. योगेश ठाकुर यांनी आम्हांस ला.प्र.वि.च्या कार्यपध्दतीप्रमाणे तक्रारदार यांची भेट घेवुन पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे आम्ही सहायक संचालक, नगररचना विभाग,जळगाव यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन पंच उपलब्ध करुन घेतले.

कासोदा पो.स्टे
१८/२०२६
भ्रष्टाचार प्रति.
अधि. कलम-७,१२
प्रमाणे दाखल
दि.म. ०२ वर
वेळ-०५/११वा
नोंद घेतली
आहे.
(सही)
HC 3043
पो. ठाणे अंमलदार
कासोदा पो. स्टे

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार पोकॉ/अमोल सुर्यवंशी, पोकॉ/ सचिन चाटे यांचेसह सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या साहित्यासह शासकीय वाहन क्र. एम.एच. १९, एम ०७८० या वरील चालक पोकॉ/८० प्रदिप रमेश पोळ यांचेसह ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयातुन रवाना होवुन जळगाव- आकाशवाणी चौक, पाळधी या मार्गाने एरंडोल शहराच्या अलीकडे पाटाचे चारीजवळ जावुन पोहचलो. सदर ठिकाणी एक इसम उपस्थित होते. त्यास आम्ही नाव, पत्ता विचारुन खात्री केली असता तो तक्रारदार असलम शेख गफ्फार असल्याची खात्री झाली. त्यांना आम्ही, पंच, सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव असलम शेख गफ्फार,वय ३०, धंदा-मजुरी रा. मुल्लावाडा एरंडोल ता.एरंडोल जि.जळगाव असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.

आम्ही तक्रारदार असलम शेख यांना त्यांचे तक्रारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की,''मी, माझा मित्र आवेजखान यांचे वडील मोहम्मद खान यांचे नावे असलेले एम एच १९/७२१२ नंबरचे ट्रॅक्टर भाडेतत्वावर चालविण्यासाठी घेतले आहे. सदर ट्रॅक्टर मी आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी सकाळी ७. ०० वा. चे सुमारास विजय नाईक याचेकडे देवुन त्यास वाळु भरण्यासाठी उत्राण येथील गिरणा नदीपात्रात पाठवले होते. तेव्हा सदरचे ट्रॅक्टर सजा उत्राण अहिर येथील तलाठी नरेश शिरुड यांनी पकडले बाबत मला ट्रॅक्टर वरिल चालक विजय नाईक याने फोन करुन कळवले होते. परंतु मी एरंडोल येथे असल्याने उत्राण येथील मित्र आमीन शेख हुसैन यास फोन करुन पकडलेल्या ट्रॅक्टर बाबत तलाठी नरेश शिरुड यांना भेटण्यासाठी पाठवले होते.

त्यानंतर माझा मित्र अमीन याने मला फोन करुन तलाठी नरेश शिरुड यांनी पकडलेले ट्रॅक्टर सोडुन दिला म्हणुन त्याकरिता २५,०००/-रुपयांची मागणी करत आहेत. ते मिटींगसाठी एरंडोल येथे येणार आहेत, तेव्हा तु त्यांना भेटुन घे, असे सांगुन मला तलाठी नरेश शिरुड यांचा मोबाईल नंबर टेक्स्ट मेसेज केला होता. तेव्हा मी त्यास आता माझे जवळ एवढे पैसे नाहीत. मी तलाठी नरेश शिरुड यांना एरंडोल येथे भेटतो असे सांगीतले होते. जर मी तलाठी नरेश शिरुड यांना त्यांचे मागणी प्रमाणे २५,००० /-रुपये दिले नाही तर ते माझे ट्रॅक्टरवर कारवाई करतील व मला त्रास देतील म्हणुन मी नाईलाजास्तव त्यांना लाच रक्कम देण्यास तयार झालो आहे.

(सही) Smita

Scanned with OKEN Scanner

मला तलाठी नरेश शिरुड यांना लाच देण्याची ईच्छा नसुन लाचमागणी संदर्भात मी त्यांची एरंडोल येथे भेट घेणार आहे. त्या दरम्यान त्यांनी माझेजवळ पैशांची मागणी केल्यास त्यांचेवर कारवाई करावी, म्हणुन मी तक्रार देत आहे. माझा तलाठी नरेश शिरुड यांचेशी कोणत्याही प्रकारचा आर्थिक देवाण घेवाण, उसनवारीचा व्यवहार नाही अथवा माझा त्यांचेशी कोणत्याही प्रकारचा वैरभाव नाही. वगैरे मा‍ा ची सविस्तर तक्रार दिली होती. त्यावर तक्रारदार असलम शेख, आम्ही तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या होत्या.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तक्रारदार असलम शेख व पंच क्र.१ श्री.गजानन वाणी यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोकॉ/अमोल सुर्यवंशी यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार असलम शेख यांचे शर्टचे आत गळयामध्ये लटकवुन देवुन तक्रारदार यांचेकडील स्प्लेंडर मोटर सायकल क्रमांक जी जे १६ सी क्यु २३९७ वरुन एरंडोल शहरातील कासोदा रोडवरील दत्त मंदिराजवळ रवाना केले होते.

तक्रारदार असलम शेख व पंच क्र.१ श्री गजानन वाणी हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोकॉ/अमोल सुर्यवंशी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारपुस करुन त्यांचेमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार व तलाठी श्री.नरेश शिरुड यांचे सोबत एरंडोल शहरातील कासोदा रोडवरील दत्त मंदिराजवळ भेट झाली. तेव्हा त्यांचे सोबत गुजरहद्दचे तलाठी शिवाजी घोलप हे देखिल हजर होते. तेव्हा तक्रारदार व तलाठी श्री.नरेश शिरुड यांचेत तक्रारदार यांचे पकडलेले वाळुचे ट्रॅक्टर सोडुन दिले बाबतचे कामा बाबत चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान तलाठी श्री.नरेश शिरुड यांनी तक्रारदार यांचे पकडलेले वाळुचे ट्रॅक्टर सोडुन दिल्याचे मोबदला म्हणुन ३०,०००/-रुपयाची मागणी केली तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना २५,०००/- रुपये सांगितले असता, त्यांचे सोबतचे तलाठी श्री.शिवाजी घोलप यांनी तक्रारदार यांना २५,०००/- नाही ३०,०००/-रुपये सांगितले होते असे बोलुन तलाठी नरेश शिरुड यांचे लाच मागणीचे समर्थन करुन, तक्रारदार यांना लाचरक्कम देण्यासाठी प्रोत्साहित करुन, तक्रारदार यांना लाच रक्कम रात्री ०८.३० वाजेपर्यंत उत्राण येथे घेवुन ये, नाहीतर आम्ही बघ काय करतो, असे सांगितले बाबत खात्री झाली होती, तसा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र.२ योगेश गायकवाड यांनी सदर नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. पोकॉ/सचिन चाटे यांनी सदर लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर नोटा तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुकडील पुढील खिशात व्यवस्थित ठेवुन दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार व सापळा पथकासह शासकिय वाहनाने एरंडोल येथुन रवाना होवुन, उत्राण येथे गुजरहद तलाठी कार्यालया जवळ पोहचलो.

त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सचुना दिल्या. पोकॉ/अमोल सुर्यवंशी यांनी आमचे सुचनेवरुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरु करुन तक्रारदार असलम शेख यांचे शर्टाचे आत लावुन दिले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र. १ गजानन वाणी यांना लाच रक्कम देण्यासाठी गुजरहद्द उत्राण ग्रामपंचायत कार्यालयाचे वरील खोलीमध्ये पायी रवाना केले. आम्ही सापळा पथकातील सदस्य असे त्यांचे मागोमाग रवाना झालो.

तक्रारदार व पंच क्र.१ गजानन वाणी हे गुजरहद्द उत्राण ग्रामपंचायत कार्यालयाचे वरील खोलीमध्ये गेले. त्यानंतर आम्ही सदर कार्यालयाच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास इशारा केला, ती वेळ २१.२४ वाजेची होती. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने सदर ठिकाणी जावुन तलाठी श्री नरेश शिरुड व तलाठी शिवाजी घोलप यांना ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोकॉ/अमोल सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर

Scanned with OKEN Scanner

ताब्यात घेवुन ते बंद केले. आम्ही ताब्यात घेतलेले तलाठी श्री नरेश शिरूड यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव नरेश भास्कर शिरूड, वय ४१ वर्षे, व्यवसाय नोकरी, तलाठी, सजा उत्राण अहिरहद्द ता.एरंडोल जि जळगांव रा.प्लॉट नं.१३,गट नं.१७९,दत्त मंदिरासमोर,वाघ नगर,जळगाव व तलाठी शिवाजी घोलप यांनी त्यांचे पुर्ण नाव, पत्ता शिवाजी एकनाथ घोलप, वय ४६ वर्षे, व्यवसाय नोकरी, तलाठी, सजा उत्राण गुजरहद्द ता.एरंडोल जि जळगांव रा.अहिल्यादेवी नगर,पहुरपेठ ता.जामनेर जि.जळगाव असे सांगितले.

तरी दिनांक २७.०१.२०२६ रोजी तलाठी नरेश शिरूड यांनी तक्रारदार यांचे पकडलेले वाळुचे ट्रॅक्टर सोडुन दिल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार असलम शेख यांचेकडे ३०,०००/-रुपये लाचेची मागणी केली. तसेच तलाठी शिवाजी घोलप यांनी तलाठी नरेश शिरूड यांनी मागणी केलेल्या लाचमागणीचे समर्थन करून, तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्यासाठी प्रोत्साहित करून, सदर लाचेची रक्कम २१.२४ वाजेच्या सुमारास पंच क्र. १ यांचेसमक्ष गुजरहद्द उत्राण ग्रामपंचायत कार्यालयाचे वरील खोलीमध्ये स्विकारली, म्हणुन माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

**समक्ष,**

पो. ठाणे अंमलदार
कासोदा पो. स्टे

**ही फिर्याद दिली.**
**दि.२८/०१/२०२६.**

स्मिता नवघरे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
जळगांव

Scanned with OKEN Scanner

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** कासोदा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0018 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 28/01/2026 05:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 27/01/2026
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 27/01/2026
**Time From (वेळेपासून):** 21:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 28/01/2026 **Time (वेळ):** 04:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 28/01/2026 04:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत कार्यालयाचे वरील ख, गुजरहद्द उत्राण,एरंडोल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): स्मिता नवघरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव,जळगांव,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव,जळगांव,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7387354672

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नरेश भास्कर शिरुड | | | 1. सजा उत्राण अहिरहद्द,एरडोल, कासोदा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | शिवाजी एकनाथ घोलप | | | 1. तलाठी सजा ,उत्राण गुजरहद्द, एरंडोल,कासोदा,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

कासोदा पोलीस स्टेशन सी.सी.टी.एन.एस नं.18/2026भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 ,12 प्रमाणे

पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याची माहिती

फिर्यादी- स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

आरोपी - 1) नरेश भास्कर शिरुड वय 41 वर्ष व्यवसाय-नोकरी,तलाठी,सजा उत्राण अहिरहद्द ता.एरंडोल जि.जळगांव रा.प्लॉट नं.13 गट नं.179,दत्त मंदीरासमोर,वाघ नगर, जळगांव

(2) शिवाजी एकनाथ घोलप वय-46 वर्ष,व्यवसाय-नोकरी,तलाठी सजा उत्राण गुजरहद्द ता.एरंडोल जि.जळगांव रा.अहिल्यादेवी नगर,पहुरपेठ ता.जामनेर जि.जळगांव.

गुन्हा.घडला ता.वेळ व ठिकाण – दिंनाक 27/01/2026 रोजी 21.24 वाजेचे सुमारास गुजरहद्द उत्राण ग्रामपंचायत कार्यालयाचे वरील खोलीमध्ये.

लाच मागणीची रक्कम – 30,000/- रु

स्वीकारलेली रक्कम- 30,000/- रु (त्यात 500/-रु दराच्या 60 चलनी नोटा) अ.पा.लावलेल्या.

सापळा अधिकारी - स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

तपास अधिकारी- श्री हेमंत नागरे,पोलीस निरीक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव.

गुन्हयाची थोडक्यात हकीगत - यातील तक्रारदार यांनी दिंनाक 27/01/2026 रोजी सकाळी 7.00 वाजेचे सुमारास एम एच 19/7212 नंबरचे ट्रक्टर वर चालक विजय नाईक यांचेकडे देउन त्यास वाळु भरण्यासाठी उत्राण येथील गिरणा नदीपात्रात पाठवले होते.तेव्हा वर नमुद ट्रॅक्टर सजा उत्राण अहिर येथील तलाठी नरेश शिरुड यांनी पकडले होते तेव्हा ट्रॅक्टर वरील चालक नाईक याने 7.30 वाजेचे सुमारास फियादी यांना फोन करुन कळवले होते. तेव्हा फिंयादी हे एरंडोल येते असल्याने त्यांनी त्यांचा उत्राण येथील मित्र अमिन शेख हुसैन यास फोन करुन तलाठी नरेश शिरुड यांना भेटण्यासाठी पाठविले होते.

त्यानंतर फिंयादी यास मित्र अमीन याने फोन करुन तलाठी नरेश शिरुड यांनी पकडलेले ट्रॅक्टर सोडुन दिला म्हणुन त्याकरिता 25,000/-रुपयांची मागणी करत आहेत ते आज रोजी दुपारी 4 वाजेचे सुमारास मिटींगसाठी एरंडोल येते येणार आहेत तेव्हा तु त्यांना भेटुन घे असे सांगुन तलाठी नरेश शिरुड यांचा मोबाईल नंबर टेक्स्ट मेसेज केला होता.तेव्हा तक्रारदार यांनी त्यास आता माझे जवळ एवढे पैसे नाहीत मी तलाठी नरेश शिरुड यांना एरंडोल येथे भेटतो, असे सांगितले होते तेव्हा तलाठी श्री नरेश शिरुड यांनी तक्रारदार यांच्याकडे 25,000/-रु लाचेची मागणी केले बाबत तक्रारदार यांनी दिंनाक 27/01/2026 रोजी ला.प्र.वि.जळगांव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

त्याप्रमाणे दिंनाक 27/01/2026 रोजी सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीत नमुद केलेप्रमाणे तक्रारदार यांचेकडे तलाठी नरेश शिरुड यांनी तक्रारदार यांचे पकडलेले वाळुचे ट्रॅक्टर सोडुन दिल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार असलम शेख यांचेकडे 30,000/-रुपये लाचेची मागणी केली तसेच तलाठी शिवाजी घोलप यांनी तलाठी नरेश शिरुड यांनी मागणी केल्या लाचमागणीचे समर्थन करुन,तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्यासाठी प्रोत्साहीत करुन,सदर लाचेची रक्कम पंच क्र.1 यांचेसमक्ष तलाठी कार्यालय,गुजरहद्द उत्राण येथे स्विकारली म्हणुन गुन्हा. सोबत टंखलिकीत केलेली फिंयाद जोडली असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री हेमंत नागरे,पोलीस निरीक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव हे करीत आहे.

दाखल अंमलदार – पोहेकॉ/3043 श्रीराम पाटील नेम. कासोदा पोलीस स्टेशन



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
SHRIKANT ANKUSH PATIL(I (Inspector)) / 151000402SAPM8801 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो. ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SHRIKANT ANKUSH I
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 151000402SAPM8801



Scanned with OKEN Scanner